**पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम**

काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.

कार्यालय दूरध्वनी क्र. — ०७२५२-२३४८२४

ई-मेल :- sp.washim@mahapolice.gov.in

वेबसाईट :- www.washimpolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

**• प्रेस नोट •** दि.२३.०४.२०२२

## ‘सर्वधर्मसमभाव’ हि भावना जोपासत सर्वांनी शांततेत सण, उत्सव व रमजान ईद साजरी करावी — पोलीस अधिक्षक, वाशीम.

***

आगामी सण, उत्सव, रमजान ईद व सद्यस्थितीमध्ये राज्यातील तापलेले धार्मिक वातावरण पाहता पोलीस अधीक्षक श्री.बच्चन सिंह (IPS) हे समाजामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत सामाजिक एकोपा निर्माण व्हावा व सर्वांनी सर्वधर्मसमभावाने गुण्यागोविंदाने नांदावे यासाठी सतत उपक्रमशील व प्रयत्नशील आहेत. याच पार्श्वभूमीवर मुस्लीम बांधवांच्या रमजान या पवित्र महिण्याच्या निमित्ताने आयोजित इफ्तार कार्यक्रमाला हजर राहून मा.पोलीस अधिक्षक श्री.बच्चन सिंह (IPS) यांनी सर्व मुस्लीम बांधवांना व सर्वधर्मियांना रमजानच्या शुभेच्छा दिल्या.

दि.१८.०४.२०२२ रोजी वाशिम शहर येथील नबी साहब मस्जिद, दि.२१.०४.२०२२ रोजी मंगरुळपीर येथील नगीना मस्जिद व दि.२२.०४.२०२२ रोजी कारंजा लाड येथील महेश भवन येथे आयोजित केलेल्या इफ्तार कार्यक्रमास मा.पोलीस अधिक्षक श्री.बच्चन सिंह (IPS) हे हजर होते. सदर कार्यक्रमाला उपविभागीय पोलीस अधिकारी मंगरूळपीर श्री.यशवंत केडगे, उपविभागीय पोलीस अधिकारी कारंजा श्री.जगदीश पांडे, पो.स्टे.वाशीम शहर ठाणेदार श्री.रफिक शेख, पो.स्टे.मंगरूळपीर ठाणेदार श्री.सुनील हूड, पो.स्टे.कारंजा ग्रामीण ठाणेदार श्री.गजानन धंदर व समाजातील मान्यवर मुस्लीम बांधव उपस्थित होते. यावेळी बोलतांना पोलीस अधिक्षक श्री.बच्चन सिंह (IPS) यांनी समाजामध्ये शांतता व सुव्यवस्था नांदावी यासाठी सर्वांनी गुण्यागोविंदाने नांदत सर्वधर्मसमभाव बाळगावा, ‘एकमेकां सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ’ या संतवचनाप्रमाणे एकमेकांना मदत करत मिळून मिसळून राहण्याबाबत आवाहन केले. त्याचबरोबर सर्वांनी एकमेकांशी बांधिलकी जोपासत कायद्याचे पालन करावे अन्यथा कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई केली जाईल असे सांगितले.

तसेच दि.२३.०४.२०२२ रोजी आगामी सण, उत्सव, रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधिक्षक कार्यालय येथील सभागृहात सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांची आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर आढावा बैठकीमध्ये वाशिम जिल्ह्यातील शांतता व सुव्यवस्थेचा उपविभागीय व पोलीस स्टेशन स्तरावर आढावा घेण्यात आला. आगामी रमजान ईद व इतर सण-उत्सवांच्या अनुषंगाने आवश्यक त्या सूचना सदर बैठकीत देण्यात आल्या. यावेळी कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याबरोबर वि.न्यायालयात व लोकअदालतमध्ये दोषसिद्धिकरिता सतत प्रयत्न करून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पो.स्टे.रिसोडचे पैरवी पोहेकॉ./१३, बळीराम सानप, नापोकॉ./९७८, परमानंद जायभाये, पो.स्टे.मंगरूळपीरचे पैरवी मपोकॉ./१२७६, सुप्रिया डोंगरे व पो.स्टे.कारंजा ग्रामीणचे पोकॉ./१२३३, सुनील पवाने या ०४ पैरवी अंमलदारांचा मा.पोलीस अधिक्षक श्री.बच्चन सिंह (IPS) यांच्याहस्ते प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

आगामी सण, उत्सव व रमजान ईद शांततेत पार पाडण्याकरिता वाशिम जिल्हा पोलीस दल सुसज्ज असून सर्वांनी शांतता राखत सण, उत्सव व रमजान ईद साजरी करावी व कायद्याचे पालन करून सहकार्य करावे असे आवाहन वाशिम जिल्हा पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.

**(जनसंपर्क अधिकारी)**
पोलीस अधिक्षक कार्यालय,
वाशिम यांचेकरिता